# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

डॉ. सुरेंद्र रा. काळबांडे
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
E-Mail –registrar@pdkv.ac.in


**महत्वाचे**

विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेले सर्व कार्यालय/ विभाग तसेच महाविद्यालय/ कृषि तंत्र विद्यालय/ कृषि विज्ञान केंद्र येथील कार्यालय प्रमुखांचे कार्यालयीन स्तरावर अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीबाबत करावयाची कार्यवाही...

वाचा : (१) विद्यापीठ आदेश क्र. बीएबी/म.त.नि.स./२०२०/१३१, दि. १४ मे, २०२०
(२) विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएबी/म.त.नि.स./२०२२/७९, दिनांक : १५ मार्च,२०२२

## परिपत्रक

क्र. बीएबी/म.त.नि.स./२०२३/१३७/342 दिनांक :03 मे, २०२३

उपरोक्त विद्यापीठ आदेशान्वये लैंगिक सतावणुकीशी संबंधीत तक्रारीचे निवारण करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर संदर्भिय क्र. १ अन्वये विद्यापीठ महिला तक्रार निवारण समितीचे गठन करण्यात आलेले असून समितीची कार्यकक्षा निर्धारित करण्यात आलेली आहे. तसेच संदर्भिय क्र. २ वरील विद्यापीठ परिपत्रकानुसार सर्व कार्यालय प्रमुखांना अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीचे गठण व कार्यवाहीबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, काही कार्यालयांकडून सदर आदेश व परिपत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन केल्या जात नाही. करिता पुन:श्च सुचित करण्यात येते की, कार्यालय प्रमुखांना लैंगिक सतावणुकीशी संबंधित तक्रार प्राप्त झाल्यास प्रथमत: त्यांनी त्यांचे स्तरावर गठीत असलेल्या अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीमध्ये सदर तक्रारीची दखल घेवुन चौकशी करावी व योग्य तो निर्णय घ्यावा. सदर निर्णयाने तक्रारकर्त्याचे समाधान न झाल्यास संदर्भिय क्र. २ नुसार निर्देशित केल्याप्रमाणे कार्यालय प्रमुखांनी विद्यापीठस्तरीय महिला तक्रार निवारण समितीकडे तक्रारीचे प्रकरण चौकशी अहवालासह प्रशासनामार्फत सादर करावे.

तसेच उल्लेखित विद्यापीठ आदेश व परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व गोपनियतेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला